दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

दिनांक : ३ ऑगस्ट २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : पंचमी तिथी (रात्री १०:५४ पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी नक्षत्र : उत्तराभाद्रपदा नक्षत्र (रात्री ०९:५९ पर्यंत) त्यानंतर रेवती नक्षत्र योग : सुकर्मा योग (रात्री ०९:१२ पर्यंत) त्यानंतर धृति योग करण : कौलव करण (सकाळी ११:०८ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण

### तुम्ही भाजपाकडून आलात का?

**पुणे :** नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि जंतर मंतर येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेला लाठीमार हे मुद्दे सध्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गाजत आहेत. यादरम्यान, आज संसदेबाहेर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि एका पत्रकारामध्ये झालेला सवाल जबाब चर्चेचा विषय ठरला आहे. या पत्रकारानेराहुल गांधी यांना जंतर मंतर येथे आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झटापटीत जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या मागणीबाबत प्रश्न विचारला. तेव्हा वैतागलेल्या राहुल गांधी यांनी तुम्ही भाजपाडून आला आहात का?

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### सारांश वृत्त

**"पोलिसांवरील दगडफेक भाजपच्याच गुंडांनी केली":अभिजित दिपकेंचा गंभीर आरोप, पोलिसांच्या दुटप्पी भूमिकेवरही सवाल उपस्थित**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनात जखमी झालेल्या दिल्ली पोलिस आणि सुरक्षा दलांच्या कुटुंबीयांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी सांगितले की पोलिसांवर देखील दगडफेक झाली. एका पोलिस जवानाच्या मुलीने सांगितले की, 'माझे वडील जेव्हा घरी यायचे, तेव्हा म्हणायचे की आता हे विद्यार्थ्यांचे आंदोलन राहिलेले नाही, यात चुकीचे लोक सामील झाले आहेत. २० जुलै रोजी माझ्या वडिलांचे सहकारी त्यांना रात्री १० वाजता घरी घेऊन आले. त्यांच्या डोक्याला ५ टाके होते. त्यांचा गणवेश रक्ताने माखलेला होता, तरीही सोशल मीडियावर त्यांनाच गुन्हेगार ठरवले गेले.' कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी पोलिसांवरील दगडफेकीवर प्रतिक्रिया दिली आहे.

अभिजित दिपके म्हणाले, जे एक महिन्यापासून तिथे आंदोलन करणारे सीजेपीचे विद्यार्थी आंदोलनकर्ते होते, त्यांनी हिंसा केलेली नाही. ज्यांनी कोणी मारामारी केली ते भाजपचे गुंड होते. पोलिसांसोबत जे झाले ते वाईटच झाले आहे. पण बघायला गेले तर दगड कोणी आणून ठेवले होते? दगडांनी भरलेला ट्रक कसा आला? हे सगळे काही भाजपच्या लोकांनी केले आहे आणि त्यांनीच पोलिसांवर दगडफेक केली आहे.

आम्ही कोणत्याच हिंसेचे समर्थन करत नाही. जयणी दगडफेक केली त्यांच्यावर कारवाई करू शकता, पण ज्या विद्यार्थ्यांनी काहीच केले नाही त्यांना का त्रास दिला जात आहे? असा सवाल दिपके यांनी उपस्थित केला आहे.

# प्रश्नांवर उत्तर नाही आता आरटीआयचा मारा?

## सरकारची नवी रणनीती की सीजेपीला चौकशीच्या जाळ्यात अडकवण्याचा अजेंडा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

केंद्र सरकारवर टीका करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) आणि तिचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्याविरोधात आता तक्रारी, आरटीआय अर्ज आणि आर्थिक चौकशीच्या मागण्यांचे सत्र सुरू झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे दुखावल्याचा दावा करणारे अमित तिवारी यांनी महाराष्ट्र सरकार, भारतीय निवडणूक आयोग आणि जीएसटी विभागाकडे विविध तक्रारी आणि माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज दाखल केल्याची माहिती दिली आहे.

तिवारी यांनी सीजेपीच्या आंदोलनासाठी मिळणाऱ्या निधीची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, ज्येष्ठ विधिज्ञ आणि राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल यांनी आंदोलकांच्या कायदेशीर मदतीसाठी जाहीर केलेल्या १ कोटी रुपयांच्या निधीची चौकशी करण्याची मागणीही निवडणूक आयोग आणि कर विभागाकडे केली आहे.

याशिवाय, अभिजीत दिपके यांचे वडील भगवानराव दिपके, हे निवृत्त सरकारी कर्मचारी असताना त्यांच्या मुलाच्या परदेशातील शिक्षणासाठी निधी कुठून आला,



याची आर्थिक चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

अमित तिवारी यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित करत कॉकरोच जनता पार्टी ही अधिकृतपणे नोंदणीकृत राजकीय पक्ष आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील कलम २९-अ अंतर्गत पक्षाची नोंदणी झाली आहे का, याची तपासणी करण्याची मागणी केली आहे.

मात्र या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात नवा प्रश्न उपस्थित झाला आहेसरकारवर टीका करणाऱ्या किंवा आंदोलन करणाऱ्या व्यक्तींविरोधात तक्रारी, आरटीआय, आर्थिक चौकशी आणि कायदेशीर प्रक्रियांचा वाढता वापर ही केवळ वैयक्तिक कारवाई आहे की व्यापक राजकीय रणनीती?

या प्रश्नाचे उत्तर अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमित तिवारी यांच्या तक्रारी या त्यांचा वैयक्तिक उपक्रम असल्याचे दिसते; त्या सरकारने निर्देशित केल्या आहेत, असा कोणताही सार्वजनिक पुरावा सध्या उपलब्ध नाही. त्यामुळे सरकारची नवी रणनीती असा निष्कर्ष काढणे हे सिद्ध झालेल्या तथ्यांवर आधारित नाही. संबंधित तक्रारींची दखल घेऊन संबंधित यंत्रणा पुढील कारवाई करतात की नाही, याकडे आता लक्ष लागले आहे.

## 'रामाच्या नावाने देणगी पण हिशेबाचा रामनाम?' २०० जणांना एसआयटीच्या नोटिसा; माजी पदाधिकाऱ्यांनाही चौकशीचे समन्स

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहार प्रकरणात तपासाचा वेग वाढला असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) मोठी कारवाई सुरू केली आहे. या नव्या टप्प्यात २०० हून अधिक कर्मचारी, संबंधित व्यक्ती आणि व्यवस्थापनाशी निगडित घटकांना चौकशीसाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

एसआयटी मंदिरातील देणगी मोजणी प्रक्रिया, सुरक्षा व्यवस्था, आर्थिक व्यवहार आणि दैनंदिन प्रशासन यांची साखळी तपासत असून, देणगीच्या प्रत्येक टप्प्याचा बारकाईने मागोवा घेत आहे. या प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे, राजीनामा दिलेले माजी पदाधिकारी चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनाही पुन्हा चौकशीसाठी नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे तपास आता केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित न राहता निर्णय घेणाऱ्या स्तरापर्यंत पोहोचल्याचे संकेत मिळत आहेत.

देणगीतील कथित गैरव्यवहाराचा नेमका माग काढण्यासाठी एसआयटीने फॉरेन्सिक लेखापरीक्षक (चार्टर्ड अकाउंटंट) तज्ज्ञांची मदत घेतली आहे. मंदिरातील जमा-खर्चाच्या नोंदी, बँक व्यवहार आणि आर्थिक कागदपत्रांचे फॉरेन्सिक लेखापरीक्षण केले जाणार आहे. यामुळे कथित आर्थिक अनियमिततेचे स्वरूप आणि जबाबदारी स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

तपास यंत्रणांनी यापूर्वी आठही आरोपींना पोलिस कोठडीत घेऊन चौकशी केली असून, अनेक महत्त्वाचे पुरावेही जप्त केल्याची माहिती आहे. यापूर्वी उत्तर प्रदेश सरकारच्या एसआयटीने सर्वोच्च न्यायालयात स्थिती अहवाल सादर केला होता. त्यानंतर न्यायालयाने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली अधिक सखोल तपास करण्याचे निर्देश दिले.

श्रद्धेच्या नावाने जमा झालेल्या प्रत्येक रुपयाचा हिशेब पारदर्शक असायलाच हवा. मात्र या प्रकरणात आरोप, चौकशी, नोटिसा आणि फॉरेन्सिक तपास यांमुळे एकच प्रश्न अधिक तीव्र झाला आहेरामाच्या नावाने आलेल्या देणगीचा हिशेब नेमका कोण देणार?

## 'परिसीमनाची भीती नको २०२९ पर्यंत सगळं जैसे थे!' अमित शाहांचा दावा; पण मग नव्या विधेयकांची घाई कशासाठी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । विशेष प्रतिनिधी

केंद्र सरकारने मांडलेल्या संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६ आणि परिसीमन विधेयक, २०२६ यावरून सुरू असलेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. २०२९ पर्यंत होणाऱ्या सर्व निवडणुका सध्याच्याच मतदारसंघांच्या रचनेनुसार आणि विद्यमान व्यवस्थेनुसार होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

अमित शाह म्हणाले की, परिसीमन आयोगाचा अहवाल तयार झाला म्हणून तो आपोआप लागू होत नाही. तो लागू होण्यासाठी संसदेची मंजुरी आणि त्यानंतर राष्ट्रपतींची संमती आवश्यक आहे. त्यामुळे २०२९ पूर्वी परिसीमन लागू होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा दावा त्यांनी केला.

दक्षिण भारतातील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होईल, असा विरोधकांचा आरोप फेटाळताना शाह म्हणाले की, दक्षिणेचे नुकसान होणार असल्याचा प्रचार हा केवळ राजकीय कथानक उभे करण्याचा प्रयत्न आहे. या विधेयकांमुळे कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकशाहीवर भाष्य करताना शाह यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. या देशातून लोकशाही संपवण्याची ताकद कोणातही नाही. आणीबाणीच्या काळात ज्यांनी लोकशाही दडपण्याचा प्रयत्न केला, त्यांना जनतेनेच सत्तेतून दूर केले, असे ते म्हणाले. मात्र, शाह यांच्या स्पष्टीकरणानंतरही राजकीय प्रश्न कायम आहेत. जर २०२९ पर्यंत कोणताही बदल होणार नसेल, तर मग या विधेयकांना एवढी घाई का? दक्षिणेच्या प्रतिनिधित्वाबाबत निर्माण झालेल्या शंका दूर करण्यासाठी केवळ आश्वासने पुरेशी ठरतील का, की सरकारला अधिक स्पष्ट आणि कायदेशीर हमी द्यावी लागेल, यावर आता राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## '८० टक्के मतदान झाले म्हणजे लोकशाही जिवंत झाली, असे नाही!' तुकाराम मुंढेंचा थेट सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष वृत्त

केवळ मोठ्या प्रमाणावर मतदान झाले म्हणून लोकशाही मजबूत झाली, असे मानणे चुकीचे ठरेल. जागरूक, प्रश्न विचारणारे आणि तथ्य पडताळून पाहणारे नागरिक हीच खरी लोकशाहीची ताकद आहे, असे स्पष्ट प्रतिपादन प्रामाणिक आणि शिस्तप्रिय आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी केले.

अमरावतीतील पोटे इस्टेटच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित 'संवाद तरुणाईशी' या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी लोकशाही, संविधान, सोशल मीडिया आणि तरुणांची सामाजिक जबाबदारी या विषयांवर परखड मते मांडली.

मुंढे म्हणाले, केवळ ८० टक्के मतदान होणे म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाही तेव्हाच मजबूत होते, जेव्हा नागरिक जागरूक असतात आणि योग्य-अयोग्याचा विचार करून निर्णय घेतात. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून



प्रत्येक नागरिकाला दिलेल्या मतदानाच्या अधिकाराची आठवण करून देत, हा अधिकार केवळ मतदानापुरता मर्यादित न ठेवता जबाबदार नागरिकत्वासाठी वापरण्याचे आवाहन केले.

सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना त्यांनी इशारा दिला की, आजच्या डिजिटल युगात रिल्स आणि सततच्या माहितीच्या भडिमारामुळे एकाच गोष्टीची वारंवार पुनरावृत्ती होत राहते आणि तीच गोष्ट सत्य असल्याचा आभास निर्माण होतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वाचलेली किंवा पाहिलेली माहिती सत्य आहे का, याची पडताळणी करण्याची सवय लावली पाहिजे.

आवाज मोठा असण्यापेक्षा विचार मोठा असणे अधिक महत्त्वाचे आहे. विचार मोठा करायचा असेल, तर आवाज लहान करावा लागतो, असेही त्यांनी नमूद केले.

तरुणांना प्रेरणा देताना मुंढे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नेल्सन मंडेला यांची उदाहरणे देत, इतिहासात नाव कोरण्यासाठी नव्हे तर समाजाला पुढे नेण्यासाठी प्रामाणिकपणे काम करा, असा संदेश दिला. कार्यक्रमाला अमरावतीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५ ऑगस्टपर्यंत पावसाची विश्रांती; त्यानंतर पुन्हा जोरदार पुनरागमनाचा अंदाज, 'एल निनो'चीही चिंता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष वृत्त

राज्यात जुलैअखेरीस मुसळधार पाऊस झाल्यानंतर आता काही दिवस पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. १५ ऑगस्टपर्यंत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खान्देश आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडतील, तर त्यानंतर राज्यभरात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे.

ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांच्या मते, नैऋत्य मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये देशात सरासरीच्या ९४ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनीही १६ ऑगस्टनंतर पावसाचा जोर वाढेल, असे सांगितले. सध्या पॅसिफिक महासागरात मध्यम स्वरूपाची 'एल निनो' परिस्थिती असून ती आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचा मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पावसातील या संभाव्य बदलांचा विचार करून जलसाठा, शेती आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने आतापासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे.

## व्यभिचार प्रथमदर्शनी सिद्ध झाला तर पत्नीला अंतरीम पोटगी नाही! सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; कनिष्ठ व उच्च न्यायालयाचे आदेश रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

पत्नी व्यभिचारात राहत असल्याचे प्राथमिकदृष्ट्या ठोस पुराव्यांसह सिद्ध झाल्यास तिला फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) कलम १२५ अंतर्गत अंतरीम पोटगी नाकारता येऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मात्र, केवळ आरोप पुरेसा नसून व्यभिचाराचा आरोप प्रथमदर्शनी विश्वासार्ह पुराव्यांच्या आधारे स्पष्टपणे सिद्ध झाला पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना सीआरपीसीच्या कलम १२५(४) मधील तरतुदींचा सविस्तर अर्थ स्पष्ट केला. न्यायालयाने नमूद केले की, जर पत्नी व्यभिचारात राहत असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले, तर त्या परिस्थितीत अंतरीम असो वा अंतिम, कोणत्याही प्रकारच्या पोटगीवर कायदेशीर बंदी लागू होऊ शकते.

प्रकरणातील माहितीनुसार, संबंधित पती-पत्नीचा विवाह जुलै २०१४ मध्ये झाला होता. काही वर्षांनंतर वैवाहिक वाद वाढल्यानंतर मे २०२० मध्ये पत्नी आपल्या मुलासह वेगळी राहू लागली. त्यानंतर नोव्हेंबर २०२० मध्ये पत्नीने उदयपूर येथील न्यायालयात सीआरपीसी कलम १२५ अंतर्गत स्वतःसाठी आणि मुलासाठी पोटगी तसेच अंतरीम पोटगीची मागणी करणारा अर्ज दाखल केला.

या अर्जाला उत्तर देताना पतीने सीआरपीसी कलम १२५(४) अंतर्गत स्वतंत्र अर्ज दाखल करून पत्नी व्यभिचारात राहत असल्याचा दावा केला. आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ त्याने छायाचित्रे आणि डिजिटल पुरावे न्यायालयात सादर केले.

मात्र, कनिष्ठ न्यायालयाने हा मुद्दा मुख्य खटल्याच्या अंतिम सुनावणीदरम्यानच ठरविणे योग्य राहील, असे सांगत कलम १२५(४) वरील अर्ज प्रलंबित ठेवला. तसेच डिजिटल पुराव्यांची सत्यता मुख्य खटल्यात तपासली जाईल, असे नमूद करून पत्नी आणि मुलासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये, म्हणजे एकूण ५० हजार रुपये प्रतिमहिना अंतरीम पोटगी मंजूर केली. हा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयानेही कायम ठेवला.

यानंतर पतीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या भूमिकेशी असहमती दर्शवली. न्यायालयाने स्पष्ट केले की, कलम १२५(४) अंतर्गत अर्जावर प्रथम निर्णय घेणे आवश्यक आहे. जर त्या टप्प्यावर उपलब्ध पुराव्यांवरून व्यभिचाराचा आरोप प्रथमदर्शनी सिद्ध होत असेल, तर अंतरीम पोटगी मंजूर करण्यास कायदेशीर अडथळा निर्माण होतो.

यामुळे सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा तसेच राजस्थान उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन चुकीचा ठरवत प्रकरण पुन्हा कनिष्ठ न्यायालयाकडे पाठवले आहे. आता कलम १२५(४) अंतर्गत अर्जाचा गुणवत्तेच्या आधारे नव्याने निर्णय घेतल्यानंतरच अंतरीम पोटगीच्या प्रश्नावर पुढील निर्णय होणार आहे.

## संपादकीय

### अजित डोभाल की मोदी-शाह यांचा 'नॅरेटिव्ह'? देशभक्तीच्या विश्वासार्हतेचा राजकीय वापर?

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देशातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि प्रभावशाली प्रशासकीय अधिकाऱ्यांपैकी एक मानले जातात. दहशतवादविरोधी कारवाया, गुप्तचर यंत्रणांतील अनुभव आणि राष्ट्रीय सुरक्षेतील योगदानामुळे त्यांनी जनमानसात एक ठाम राष्ट्रवादी प्रतिमा निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक सार्वजनिक वक्तव्याकडे केवळ एका अधिकाऱ्याचे वैयक्तिक मत म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते.

याच पार्श्वभूमीवर 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' स्वीकारताना त्यांनी केलेले हक्कांचा अतिरेक आणि कर्तव्यांचा विसर हे विधान चर्चेचा विषय ठरले. शिस्त, जबाबदारी आणि कर्तव्य यांचा संदेश निःसंशयपणे महत्त्वाचा आहे. परंतु हा संदेश ज्या राजकीय वातावरणात दिला गेला, त्या संदर्भामुळे काही प्रश्न उपस्थित होतात.

गेल्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागरिकांच्या कर्तव्यांवर, राष्ट्रहितावर आणि शिस्तीवर सातत्याने भर दिला आहे. त्याच काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आंदोलने, विद्यार्थी चळवळी, शेतकरी आंदोलन आणि सरकारवरील टीका यांबाबत देशात तीव्र राजकीय वाद झाले आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराच्या भाषणातील शब्द आणि सत्ताधारी नेतृत्वाच्या सार्वजनिक भूमिकांमध्ये साधर्म्य दिसल्यास त्याबद्दल चर्चा होणे स्वाभाविक आहे.

मात्र, हेही तेवढेच स्पष्ट केले पाहिजे की, डोभाल यांनी हे विचार कोणाच्या राजकीय निर्देशानुसार मांडले किंवा त्यांचा उद्देश एखाद्या पक्षाच्या प्रचाराला हातभार लावणे होता, असे सिद्ध करणारा कोणताही सार्वजनिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे अशा दाव्यांऐवजी अधिक योग्य प्रश्न असा आहे की, अशा भाषणांचा राजकीय पातळीवर अर्थ कसा लावला जातो आणि त्याचा सार्वजनिक चर्चेवर काय परिणाम होतो?

लोकशाहीत नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये ही एकमेकांची प्रतिस्पर्धी संकल्पना नाहीत. भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले आहेत, तर मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. परंतु लोकशाहीचा समतोल तेव्हाच टिकतो, जेव्हा सरकारही आपल्या घटनात्मक कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करते. रोजगार, शिक्षण, कायद्याचे राज्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि उत्तरदायी प्रशासन ही राज्याची जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांच्या कर्तव्यांइतकीच सत्तेच्या कर्तव्यांवरही चर्चा व्हायला हवी.

अजित डोभाल यांची प्रतिमा ही राजकीय नेत्यापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणाऱ्या अधिकाऱ्याची आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याला सामान्य राजकीय भाषणापेक्षा अधिक नैतिक विश्वासार्हता लाभते. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, अशा विश्वासार्ह व्यक्तींकडून व्यक्त होणारे विचार सार्वजनिक मतमतांतरे घडविण्यावर प्रभाव टाकू शकतात. मात्र, त्याचा अर्थ असा होत नाही की ते एखाद्या राजकीय अजेंड्याचा भाग आहेत; हा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसा पुरावा आवश्यक असतो.

आजच्या काळात देशभक्तीची व्याख्या अनेकदा राजकीय चर्चेचा विषय बनते. सरकारला प्रश्न विचारणे, आंदोलने करणे किंवा असहमती व्यक्त करणे हे लोकशाहीतील घटनात्मक अधिकार आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रहित, सामाजिक शिस्त आणि नागरिकांची जबाबदारी यांचेही महत्त्व आहे. या दोन्ही मूल्यांमध्ये संघर्ष नसून संतुलन असणे आवश्यक आहे.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे सांगितले, तेव्हा त्यांनी अधिकार आणि जबाबदारी यांना परस्परपूरक मानले होते. म्हणूनच त्यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराच्या मंचावर कर्तव्य या संकल्पनेवर भर दिला जात असताना हक्क या संकल्पनेचे महत्त्वही तेवढ्याच ताकदीने अधोरेखित होणे आवश्यक आहे.

शेवटी, खरा प्रश्न अजित डोभाल यांच्या देशभक्तीवर नाही. प्रश्न असा आहे की, अत्यंत विश्वासार्ह सार्वजनिक व्यक्तींच्या विधानांचा राजकीय अर्थ कसा लावला जातो आणि त्यांचा उपयोग विविध राजकीय कथनांना बळ देण्यासाठी केला जातो का? हा प्रश्न विचारणे लोकशाहीविरोधी नसून, लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. कोणतीही व्यक्ती, कितीही लोकप्रिय किंवा सन्माननीय असली तरी तिच्या सार्वजनिक विधानांवर चिकित्सक चर्चा होणे हेच प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे..

# महापालिकेच्या ७७२ अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुधारित प्रगती योजनेचा लाभ

### सातव्या वेतन आयोगानुसार प्रशासकीय आदेश जारी; १०, २० आणि ३० वर्षांची सेवा पूर्ण केलेल्यांना वेतनवाढीचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार पात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती (एमएसीपी) योजनेचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महापालिकेतील ७७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवाकालानुसार पुढील वेतनस्तराचा लाभ मिळणार असून, त्यासंदर्भातील प्रशासकीय आदेश जारी करण्यात आले आहेत.

महापालिकेने सेवाविषयक नियम, समितीच्या शिफारशी आणि लागू असलेल्या प्रशासकीय निकषांचा विचार करून ही प्रक्रिया सुरू केली आहे. १०, २० आणि ३० वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.




लाभ मंजूर करण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा नोंद, पदोन्नतीसाठी आवश्यक पात्रता, विभागीय परीक्षा, गोपनीय अहवाल, प्रलंबित चौकशी, न्यायालयीन प्रकरणे तसेच अन्य सेवा अटींची सखोल पडताळणी करण्यात येत आहे.

एमएसीपी योजनेअंतर्गत पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीतील पुढील वेतनस्तराचा लाभ मिळणार आहे. तसेच २020 मध्ये लागू झालेल्या नवीन सेवा प्रवेश व सेवावर्गीकरण नियमांपूर्वी आणि त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या माहितीनुसार, १० वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या २१६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना पहिल्या टप्प्याचा लाभ, २० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या ३१९ जणांना दुसऱ्या टप्प्याचा लाभ, तर ३० वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या २३७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना तिसऱ्या टप्प्याचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. संबंधित विभागांकडून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात आहे.

याबाबत अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले की, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती (एमएसीपी) योजनेची अंमलबजावणी नियमानुसार सुरू असून पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने लाभ देण्यात येत आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेचा योग्य सन्मान होण्याबरोबरच त्यांच्या कामकाजातील उत्साह, कार्यक्षमता आणि मनोबलात वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेची NGTकडून गंभीर दखल; संयुक्त चौकशी समिती नियुक्त

### महिनाभरात अहवाल सादर करण्याचे आदेश; महापालिका, MPCB, CPCBसह संबंधितांना नोटिसा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी । प्रतिनिधी

मोशी कचरा डेपो येथे ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाल्यानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (छ्रढ) प्रकरणाची गंभीर दखल घेत तीन सदस्यीय संयुक्त चौकशी समितीची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (चझउइ), केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (उझउइ) आणि पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रतिनिधींचा या समितीत समावेश असून, घटनास्थळाची पाहणी करून एका महिन्याच्या आत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



अर्जदारांच्या वतीने ॲड. असीम सरोदे आणि सहकाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेत घनकचरा व्यवस्थापनातील कथित त्रुटी, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन तसेच वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पातील निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय कचरा डेपोजवळील प्रशासकीय इमारत नियमबाह्य उभारण्यात आल्याचाही दावा याचिकेत करण्यात आला आहे.

या प्रकरणात छ्रढने पिंपरी-चिंचवड महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित प्रकल्प संचालकांना नोटिसा बजावल्या असून, चार आठवड्यांच्या आत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी प्रकल्पप्रमुख आणि सुरक्षा अधिकाऱ्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच महापालिका प्रशासनाने पर्यावरण विभागातील दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले असून, दुर्घटनेला कारणीभूत ठरलेल्या बाबींची स्वतंत्र स्तरावर चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

छ्रढने नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल आल्यानंतर दुर्घटनेची कारणमीमांसा, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी याबाबत अधिक स्पष्टता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जमिनीची परस्पर विक्री करुन उद्योगपतीची साडेपाच कोटींची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

न्यायालयात दावा चालू असताना लोहगाव येथील एक हेक्टरपैकी ४८ आर जमिनीची कोणतीही संमती न घेता परस्पर विक्री करून ५ कोटी ७० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी लोहगाव पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे.

याबाबत रवींद्र नौपातलाल साकला (वय ६३, रा. आर. एन. एस. ॲलेक्झांड्रा रोड, घोरपडी) यांनी लोहगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी सुभाष उत्तमचंद दुगड, राजेंद्र उत्तमचंद दुगड (रा. बिबवेवाडी), संदेश अशोक भन्साळी (रा. खेड), शेख उमर लतीफ इनामदार, मेहबूब अब्दुल गफार शेख, भास्कर रेड्डी नारायण कल्लरी रेड्डी (रा. वडगाव शेरी) अशा ६ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हा प्रकार लोहगाव येथील सर्वे नंबर १६३, हिस्सा नंबर ८/१३अ/२, एकूण क्षेत्र १ हेक्टर ८ आर पैकी ४८ आर येथे व वेगवेगळ्या शासकीय दुय्यम निबंधक कार्यालयात २०१० ते सप्टेंबर २०२५ दरम्यान घडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रवींद्र साकला हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांची लोहगाव येथे जमीन आहे. आरोपी सुभाष दुगड, राजेंद्र दुगड व इतरांनी या जमिनीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. याबाबत त्यांचा न्यायालयात दावा चालू आहे. असे असताना आरोपींनी आपसात कट रचून साकला यांची कोणतीही संमती न घेता जमिनीची परस्पर विक्री केली. त्याचे ५ कोटी ७० लाख रुपये स्वीकारून फिर्यादी यांना आर्थिक नुकसान पोहोचवून फसवणूक केली आहे. लोहगाव पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# खड्डेमुक्त रस्ते, कोंडीमुक्त वाहतूक व कचरा व्यवस्थापनासाठी प्रशासनाला महिनाभराची मुदत

### आमदार महेश लांडगे यांचे निर्देश; प्रत्यक्ष कामांवर भर देण्याचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

शहरातील रस्ते, वाहतूक, अतिक्रमण, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासनाला महिनाभराची मुदत दिली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी पावसाळ्यातील खड्डे, वाहतूक कोंडी आणि मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर विस्कळीत झालेल्या कचरा संकलन व्यवस्थेवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत शहरातील सर्व प्रमुख रस्ते व पदपथ खड्डेमुक्त करणे, बीआरटी मार्ग अतिक्रमणमुक्त करणे, नाशिक फाटा-दापोडी परिसरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आराखडा तयार करणे, गरजेनुसार 'नो व्हेईकल झोन'ची अंमलबजावणी करणे तसेच पीएमपीएमएल बससेवा अधिक सक्षम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



याशिवाय प्रभाग अधिकारी, वाहतूक पोलीस आणि लोकप्रतिनिधींनी संयुक्त पाहणी करून कालबद्ध कृती आराखडा तयार करावा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही लांडगे यांनी दिले.

केवळ बैठका घेऊन प्रश्न सुटणार नाहीत. नागरिकांना प्रत्यक्ष कामे दिसली पाहिजेत. सुरक्षित, स्वच्छ आणि वाहतूक कोंडीमुक्त शहरासाठी प्रशासनाने निश्चित मुदतीत कामे पूर्ण करावीत. हलगर्जीपणा कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिला.

# मध्यरात्री फटाका बुलेट सायलेन्सर वाजवून दहशत निर्माण करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल व ११ दुचाकी जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

दि.३१/०७/२०२६ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि.०१/०८/२०२६ रोजी पहाटे ०५.०० वा. या कालावधीमध्ये काळेपडळ पोलीस ठाणे हद्दीतील कडनगर चौक, न्याती चौक, रहेस्टा विस्टा चौक, उंड्री, महंमदवाडी या परिसरांत रस्त्यांवर काही तरूणांनी बुलेट गाड्यांच्या तसेच अन्य मोटारसायकलच्या सायलेन्सरचा मोठमोठ्याने, फटाक्यांसारखा कर्णकर्कश आवाज करत दहशत निर्माण करत, धोकादायक पद्धतीने गाड्या चालविल्याच्या रिल्स सोशल मिडीयावर व्हायरल झाल्या होत्या. त्याबाबत परिसरातील नागरिकांनी रात्री परिसरांत दहशतीचे व भितीदायक वातावरण निर्माण झालेबाबत व घरातील वृद्ध व लहान मुले रात्री घाबरून दचकून उठले बाबत पोलीस ठाण्यास फोन करून तक्रारी केल्या होत्या.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्यासाठी सपोफी/राजस शेख, पोहवा / प्रविण काळभोर, पोकों/महादेव शिंदे, पोकों/ गिरीराज जगदाळे यांचे पथक नेमले होते. सदर पथकाने तांत्रिक पुरावे व गोपनिय बातमीदारांमार्फत माहिती घेऊन फटाका बुलेट सायलेन्सरचा आवाज करत दहशत निर्माण करणा-या ११ बुलेट दुचाकीस्वार व त्यांचेसोबतचे इसमांचा शोध लावून त्यांना ताब्यात घेतले व त्यांचेविरुद्ध काळेपडळ पो.स्टे. गु.र.नं. ३७५/२०२६ भा.न्या.सं. कलम २८१, २९२ सह मोटार वाहन कायदा कलम-१८४, १८२ (अ), १९४ (एफ), १९८,१७७ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेट कलम ७, केंद्रिय मोटार वाहन अधिनियम कलम १२० प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. सदर इसमांची नावे पुढीलप्रमाणे,

१) सुमीत वसंत सगट, वय २० वर्षे, रा.इंदीरानगर, महंमदवाडी, पुणे २) शिवम दिपक जाधव वय-२१ वर्ष रा. इंदिरा नगर, महंमदवाडी, पुणे ३) आर्यन जगन्नाथ गायकवाड, रा. इंद्रायणीनगर, महंमदवाडी पुणे ४) सार्थक प्रदिप अल्हाट रा. कृष्णानगर महंमदवाडी पुणे ५) राज ऊर्फ यश सागर रणदिवे रा. कृष्णानगर महंमदवाडी पुणे ६) अमन रा. वैदुवाडी, पुणे पूर्ण नाव पत्ता माहित नाही. ७) तुषार नितीन गायकवाड, रा. कृष्णानगर, महंमदवाडी, पुणे८) धिरज लक्ष्मण गेजगे रा. कृष्णानगर महंमदवाडी पुणे ९) आयान शेख रा. इंदिरा नगर महंमदवाडी पुणे १०) प्रेम गायकवाड, रा. गोपाळपट्टी मांजरी पुणे ११) दयानंद सुतार, रा. तरवडे वस्ती, महंमदवाडी, पुणे १२) वरद सनी तोडकर, वय-१८ वर्षे, रा. काळेपडल, हडपसर, पुणे १३) दिनेश रितेश लांबोटे वय-१९ वर्षे रा. सुखकर्ता अपार्टमेंट, महंमदवाडी, पुणे १४) राजेंद्र सतिश वाघमोडे रा. सुलाई कॉम्प्लेक्स मागे, महंमदवाडी, पुणे १५) रवि किसन लोखंडे वय-२० वर्षे रा.शेल पंपामागे महंमदवाडी पुणे सदर वाहन चालकांच्या एकूण ११ मो.सा. या जप्त केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे,

बुलेट क्र.MH 495 8356, बुलेट क्र. विना नंबरप्लेट, बुलेट क्र. MH 12 LF 0407, बुलेट क्र. MH 12 RC 3677, बर्गमन क. MH 12 YG 0417 बुलेट क्र. MH 12 MJ 1821, बुलेट क्र. MH 14 FN 0639, बुलेट क्र. MH 12 JX 2227 बुलेट क्र. MH 12 GP 3450 बुलेट क्र. MH 12 JB 5476 बुलेट क. MH 12 KZ 7082

तसेच, सदर मो.सा. यांचे कर्णकर्कश फटाका सायलेन्सर काढून नष्ट केलेले आहेत. उपरोक्त इसमांनी गॅरेज चालक नामे, १६) युसूफ फारुख शेख वय-२४ वर्षे धंदा-गॅरेज व्यवसाय रा. गल्ली नं ४, गुलामअली नगर, सय्यदनगर हडपसर, पुणे १७) निखील फुलाजी सरडे वय-२६ वर्षे धंदा गॅरेज व्यवसाय रा. गल्ली नं.१. संतोषीमाता नगर, काळेपडळ, हडपसर, पुणे १८) रोहन बबलू महापुरे, वय-२४ वर्षे, धंदा-गॅरेज व्यवसाय, रा. पोस्टमन कॉलनी, महंमदवाडी, पुणे यांचे गॅरेजमध्ये मॉडीफाईड सायलेन्सर बसविलेने त्यांचेविरुद्ध देखील कारवाई करणेत आली आहे. दि. ३१/०७/२०२६ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि.०१/०८/२०२६ रोजी पहाटे ०५.०० वा. या कालावधीमध्ये काळेपडळ पोलीस ठाणे हद्दीमध्ये फटाका बुलेट सायलेन्सर वाजवत दहशत निर्माण करणा-या अन्य मो.सा. स्वारांचा शोध सुरू आहे. सदरची कामगिरी ही जीवन बेनिवाल, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ६. पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गिरीषा निंबाळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आण्णासो बाबर, पोलीस निरीक्षक (गुन्हे), काळेपडळ पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे सुचनेप्रमाणे विलास सुतार, सहा. पोलीस निरीक्षक, सपोफौ/राजस शेख, पोहवा प्रविण काळभोर, अमोल फडतरे, निलेश देसाई, दाऊद सय्यद, प्रतिक लाहीगुडे, शाहीद शेख, पोअं. महादेव शिंदे, गिरीराज जगदाळे, अतुल पंधरकर, नितीन ढोले, विशाल ठोंबरे, सद्दाम तांबोळी, प्रदीप बेडीस्कर, लक्ष्मण काळे यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

# भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेची कामे विहित मुदतीत पूर्ण करा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेची सर्व कामे निर्धारित मुदतीत आणि उच्च दर्जाची पूर्ण करावीत, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांना दिले.

योजनेच्या कामांचा आढावा घेताना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी विविध टप्प्यांतील प्रगतीची माहिती घेतली. जलवाहिनी, जलशुद्धीकरण केंद्र, पंपिंग स्टेशन आणि इतर पायाभूत सुविधांची कामे नियोजनानुसार पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला. कोणत्याही कारणास्तव कामांमध्ये विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



कामाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करून प्रकल्प पूर्ण करावा, असे सांगत त्यांनी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून अडचणी तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले.

भामा आसखेड पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या पाणी गरजेची पूर्तता करण्यास मोठी मदत होणार असून, नागरिकांना अधिक सक्षम आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास हातभार लागणार आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### नदी, तलावातील प्रदूषण वाढले, बीओडीची आकडेवारी चिंताजनक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा आणि मुठा नद्यांसह प्रमुख तलावांवर सांडपाणी, प्रदूषण, अतिक्रमण आणि वाढत्या शहरीकरणाचा गंभीर परिणाम होत असल्याचे पर्यावरण अहवालातून समोर आले आहे. नदीच्या पाण्यातील जैवरासायनिक प्राणवायू (बीओडी)मध्ये मोठे चढ-उतार आढळले आहेत. विरघळलेल्या प्राणवायूचे (डीओ) प्रमाण अनेक ठिकाणी धोकादायक पातळीपर्यंत कमी झाले आहे.

पुण्याच्या नागरी जीवनात मुळा-मुठा नदीप्रणाली, पाषाण, कात्रज, जांभूळवाडी आणि लकाकी तलावांना पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्व आहे. मात्र, वाढते शहरीकरण, अतिक्रमणे, सांडपाण्याचा विसर्ग आणि प्रदूषणामुळे या जलस्रोतांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. पावसाळ्यात नदीतील पाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे काही ठिकाणी प्रदूषकाची तीव्रता कमी झाल्याचे दिसते. मात्र, अनेक ठिकाणी विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमीच राहिले. पावसाळ्यानंतर 'बीओडी'मध्ये होणारी घट अपेक्षेपेक्षा संथ आणि अनियमित असल्याचे निरीक्षण आहे. पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण दोन ते तीन मिलिग्रॅम प्रतिलिटरपेक्षा कमी झाल्यास जलचरांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण होते. ऑक्सिजन पूर्णपणे संपल्यास मासे आणि इतर सजीव जिवंत राहू शकत नाहीत. या स्थितीत प्राणवायूविना वाढणाऱ्या जिवाणूंमुळे हायड्रोजन सल्फाइड आणि मिथेनसारखे दुर्गंधीयुक्त व हानिकारक वायू तयार होतात. शहरातील पाषाण तलावाच्या पाण्याच्या गुणवत्तेत गेल्या दोन वर्षांत मोठी घसरण झाली असून, पाण्यातील जैवरासायनिक प्राणवायू (बीओडी)चे प्रमाण वाढले आहे. पाषाण आणि कात्रज तलावांतील विरघळलेल्या प्राणवायूचे (डीओ) प्रमाण २०१५ ते २०२२ या कालावधीत साधारण चार ते सात मिलिग्रॅम प्रतिलिटरच्या दरम्यान होते. हे प्रमाण जलचरांसाठी आवश्यक असलेल्या दोन मिलिग्रॅम प्रतिलिटरच्या किमान मर्यादेपेक्षा अधिक आहे. २०२३ मध्ये दोन्ही तलावांतील प्राणवायूचे प्रमाण कमी झाले होते. मात्र, २०२४ मध्ये त्यात सुधारणा होऊन ते सुमारे ५.२५ ते ५.६६ मिलिग्रॅम प्रतिलिटरपर्यंत वाढले.

# संकष्टी चतुर्थीनिमित्त अर्धपीठ गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर। प्रतिनिधी

संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथील श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात रविवारी हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. दिवसभर पावसाच्या जोरदार सरी सुरू असूनही भाविकांचा उत्साह कायम राहिला. गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात भाविकांनी शिस्तबद्ध रांगेतून श्रींचे दर्शन घेतले.

पहाटे मंदिराचे पुजारी जगदीश जोशी यांच्या हस्ते श्रींची महापूजा करण्यात आली. त्यानंतर संदीप कडुसकर, सखाराम पडवळ, दत्तात्रय भालेराव, हरिश्चंद्र गाडे, संतोष कडुसकर, रवींद्र घोडेकर आणि साक्षी शेटे यांच्या हस्ते अभिषेक संपन्न झाला. धार्मिक विधीनंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले.

सकाळी काही काळ पावसाने उघडीप दिली होती. मात्र त्यानंतर पुन्हा रिमझिम ते जोरदार पाऊस सुरू झाला. तरीही भाविकांनी पावसाची पर्वा न करता दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावली. दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सतत वर्दळ सुरू होती.




पेशवेकालीन अर्धपीठ गणपती मंदिराची उद्योजक शामभाऊ गुंजाळ यांच्या वतीने आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. सकाळी ७, दुपारी ३ आणि रात्री ७ वाजता मुख्य आरती पार पडली. चंद्रोदयानंतर श्रींना नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी अनेक भाविकांनी नवसपूर्ती करून श्रींचे आशीर्वाद घेतले.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर परिसरात सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. तसेच दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

## महिला सक्षमीकरणातील उल्लेखनीय कार्याची दखल; निघोटवाडी ग्रामपंचायतीला 'आदर्शक्ती पुरस्कार'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील निघोटवाडी ग्रामपंचायतीने महिला सक्षमीकरणासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत महिला व बालविकास विभागाने ग्रामपंचायतीला जिल्हा व तालुका स्तरावरील 'आदर्शक्ती पुरस्कार' जाहीर केला आहे. विशेष म्हणजे, निघोटवाडी ग्रामपंचायतीने दोन्ही स्तरांवर प्रथम क्रमांक पटकावत आंबेगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी प्रभावी काम करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. निघोटवाडी ग्रामपंचायतीने महिलाभिमुख शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत.

ग्रामपंचायतीने आरोग्य व पोषण क्षेत्रात कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध आरोग्यविषयक उपक्रम आयोजित केले. तसेच स्वयं-सहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगार, स्वावलंबन आणि आर्थिक बळकटी मिळावी यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. महिला आरोग्य, पोषण, शिक्षण, हक्क आणि शासनाच्या योजनांबाबत गावपातळीवर सातत्याने जनजागृती करण्यात आली.

या यशामागे लोकनियुक्त सरपंच नवनाथ निघोट, ग्रामविकास अधिकारी नवले, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट आणि ग्रामस्थांचे सामूहिक योगदान महत्त्वाचे ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

निघोटवाडी ग्रामपंचायतीला मिळालेला हा सन्मान इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरणार असून, ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## 'पोलीस' नावाच्या पाट्यांचा गैरवापर थांबणार? खासगी वाहनांवरील 'पोलीस' फलकांवर कारवाईचे आदेश; व्हीआयपी संस्कृतीवर अखेर लगाम?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रात खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी लाल अक्षरातील पाटी लावून नियमांचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात आता कठोर कारवाईचे संकेत मिळाले आहेत. ३१ जुलै २०२६ रोजी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्रानुसार, अशा वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना देण्यात आले आहेत.

या आदेशामागे सामाजिक कार्यकर्ते सखाराम कुलकर्णी यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली आहे. पत्रानुसार, काही पोलीस अधिकारी आणि माजी अधिकारी आपल्या खासगी वाहनांवर 'पोलीस' अशी लाल पाटी लावून फिरत असल्याने वाहन तपासणी




टाळली जाते आणि अशा वाहनांचा बेकायदेशीर कामांसाठी किंवा दहशत निर्माण करण्यासाठी गैरवापर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, उच्च न्यायालयाने यापूर्वी अशा प्रकाराबाबत नाराजी व्यक्त करून कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार, आता खासगी वाहनांवर 'पोलीस' नावाची पाटी किंवा तत्सम ओळख वापरणाऱ्या वाहनांवर महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १३३(६) आणि मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम १७७ अंतर्गत कारवाई करण्याची सूचना देण्यात आली आहे.

या आदेशामुळे अनेक प्रश्नही उपस्थित झाले आहेत. जर हा प्रकार इतक्या वर्षांपासून सुरू होता, तर आतापर्यंत कारवाई का झाली नाही? सामान्य नागरिकांना नियमांचे पालन करण्याची सक्ती केली जाते, पण प्रभावशाली व्यक्ती आणि अधिकाऱ्यांच्या वाहनांवरील अशा पाट्यांकडे दुर्लक्ष का झाले, असा सवाल उपस्थित होत आहे.

मात्र, या आदेशामुळे एक संदेश स्पष्ट झाला आहे कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. आता या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते आणि नियमभंग करणाऱ्यांवर खरोखरच समान निकषांवर कारवाई होते का, याकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

## मुंढवा शासकीय जमिनीचा दस्त न्यायालयाने केला रद्द; जिल्हा प्रशासनाकडून दावा मागे घेण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मुंढवा येथील शासकीय जमिनीच्या गैरव्यवहारात नोंदविण्यात आलेला दस्त जिल्हा न्यायालयाने रद्द केल्यानंतर जिल्हा प्रशासनानेही न्यायालयात स्वतंत्रीत्या दाखल केलेला दावा मागे घेण्यास नकार दिला आहे. या निकालात जमिनीच्या शासकीय मालकीबाबत संभ्रमावस्था राहिल्याने जिल्हा प्रशासनाने आपला दावा कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ही जमीन सरकारचीच असून आता ती बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या नावावर करण्याचा प्रस्तावही राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळेच दावा मागे घेण्याचा प्रश्न नाही, असे स्पष्टीकरण जिल्हा प्रशासनाने दिले आहे. याबाबत शुक्रवारी (दि. ३०) सुनावणी होणार आहे.



मुंढवा येथील ४० एकर शासकीय जमीन कुलमुख्त्यारधारक शीतल तेजवानी यांनी खासदार पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचे भागधारक दिग्विजय पाटील यांना ३०० कोटी रुपयांत विकली. मात्र, या व्यवहारात एकही रुपया मिळाला नाही. तसेच जमीनही नावावर झाली नाही, असा दावा तेजवानी यांनी जिल्हा न्यायालयात दाखल केला होता. त्यावर न्यायालयाने हा दावा मान्य करत या व्यवहारातील दस्तच रद्द केला. तसेच या व्यवहारात देण्यात आलेले मुद्रांक शुल्क परत मागण्याचा अधिकार पक्षकारांना देण्यात आला. या प्रकरणात व्यवहारच पूर्ण न झाल्याने जमिनीबाबत संबंधित कुळांकडे ताबा राहील, असा आदेशही न्यायालयाने दिला.

तत्पूर्वी ही जमीन राज्य सरकारची असल्याने व्यवहार बेकायदा असल्याचे सांगत हा दस्त रद्द करावा, असा दावा जिल्हा प्रशासनाने जिल्हा न्यायालयात केला होता. त्याबाबत सुनावणी सुरू आहे. मात्र, तेजवानी विरुद्ध अमेडिया प्रकरणात याच व्यवहारातील दस्त रद्द झाल्यानंतर जिल्हा प्रशासनानेही हा दावा मागे घ्यावा, अशी विनंती दोन्ही पक्षकारांकडून करण्यात आली. मात्र, जमिनीच्या मालकीहक्काबाबत निकाल जिल्हा प्रशासनाच्या दाव्याच्या विरोधात असल्याने दावा मागे घेण्यास जिल्हा प्रशासनाने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे.

त्यामुळे या प्रकरणात न्यायालयात लढा सुरूच राहील, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. दस्त रद्द झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या दाव्याप्रकरणी आता शुक्रवारी (दि. ३१) होणार आहे. त्यात जमिनीच्या मालकीबाबत बाजू लावून धरण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आता न्यायालया काय निकाल देते, याकडेही जिल्हा प्रशासनाचे लक्ष लागून आहे.

## कुंडमळा पुलासाठी ८ कोटींचा निधी मंजूर तरीही 'डीआरडीओ'च्या विरोधामुळे आराखडा कागदावरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील पूल पडून झालेल्या दुर्घटनेनंतर नवा पूल बांधण्यात येईल ही घोषणा अजूनही कागदावरच राहिली आहे. यासाठी ८ कोटींचा निधी मंजूरही झाला. मात्र, पुलाच्या जागेवर नवीन पूल बांधण्यासाठी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) सुरक्षेच्या कारणावरून विरोध दर्शविला आहे. त्यामुळे आता पुलासाठी नवीन जागा निश्चित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग महिनाभरात प्रकल्प अहवाल तयार करणार आहे. त्यानंतर तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर पुलाच्या कामाला सुरुवात होणार आहे. त्यासाठी किमान आणखी वर्षभराचा कालावधी लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

कुंडमळा (ता. मावळ) येथे १४ जून रोजी पूल कोसळून ४ जणांचा मृत्यू, तर अनेकजण जखमी झाले होते. त्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन गावकऱ्यांच्या सोयीसाठी नवा पूल बांधू असे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन अजूनही कागदावरच असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पुलाशेजारी असलेल्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) या पुलाच्या बांधकामाला विरोध दर्शविला आहे. हा पूल संस्थेच्या १०० मीटर आत असल्याने सुरक्षेच्या कारणावरून विरोध होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. नवीन पूल बांधण्याचे ठरल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलासाठी आवश्यक असलेला सविस्तर आराखडा तांत्रिक बाबींसह मंजूर होऊन राज्य सरकारने त्यासाठी ८ कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला. त्यासह या पुलावर दोन ठिकाणी जाळी उभारण्यात येणार होती. त्यासाठी अतिरिक्त खर्च येणार होता. त्या खर्चाला 'पीएमआरडीए'ने मान्यता दिली होती. त्यावेळी 'डीआरडीओ'ने विरोध केला नाही मात्र, पुलासाठी प्रत्यक्ष खणकाम सुरू झाल्यावर 'डीआरडीओ'ने विरोध सुरू केला. याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी 'डीआरडीओ'सह सर्व अधिकाऱ्यांची दोन वेळा बैठक घेतली. मात्र, 'डीआरडीओ'ने परवानगी देण्यास नकार दिला. त्यामुळे या जागी केवळ पादचारी पूल उभारावे असा पर्याय पुढे आला. मात्र, ग्रामस्थांनी रहदारीसाठी पूल असावा, अशी मागणी केली. त्यामुळे पुलासाठी आता नवीन जागा शोधण्याची वेळ सार्वजनिक बांधकाम विभागावर आली आहे. या पुलाच्या पुढे ३०० मीटरवर ही जागा निश्चित करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्याचा तांत्रिक अहवाल आल्यानंतरच ही जागा निश्चित केली जाईल असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने यापूर्वी मंजूर केलेल्या ८ कोटींच्या निधीतून या पुलाचे काम करण्यात येणार आहे. मात्र, नव्या पुलावर जाळ्या बसविण्यात येणार नाही. ग्रामस्थांना रहदारीसाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांना हा पूल जोडण्यासाठी काही जमीन संपादित करावी लागणार आहे.

# माळीणच्या जखमा अजूनही ताज्याच..! १२ वर्षांनंतरही पाच अतिधोकादायक गावांचे पुनर्वसन रखडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

३० जुलै रोजी माळीण येथील भीषण भूस्खलन दुर्घटनेला बारा वर्षे पूर्ण होत असताना, त्या दुर्घटनेतून शासनाने धडा घेतल्याचे दावे वारंवार केले जात असले, तरी आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील अतिधोकादायक घोषित पाच गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आजही प्रलंबितच आहे. तब्बल बारा वर्षे उलटूनही सुरक्षित निवाऱ्याची प्रतीक्षा कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माळीण दुर्घटनेनंतर राज्य शासनाच्या निर्देशानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राज्यातील भूस्खलनप्रवण गावांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या समितीने १२ फेब्रुवारी २०१५ रोजी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालात जिल्ह्यातील २३ गावांमध्ये भूस्खलनाचा धोका असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामध्ये आंबेगाव तालुक्यातील काळवाडी क्रमांक १, काळवाडी क्रमांक २ (जांभोरी), बेंढारवाडी (पोखरी), भगतवाडी (फुलवडे), पसारवाडी (माळीण), तसेच असाणे या गावांचा समावेश होता.

दुर्घटनेनंतर या गावांचे संरक्षण करण्यासाठी गावांच्या वरच्या बाजूस संरक्षण भिंती, गटारे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी शासनाने सुमारे ८९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र, ग्रामस्थांनी ग्रामसभेत ठराव करून संरक्षणात्मक उपाययोजनांऐवजी संपूर्ण गावांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्याची भूमिका घेतली. त्यानुसार हा निधी पुनर्वसनासाठी जागा खरेदी करण्यासाठी वापरण्यात आला.

काळवाडी क्रमांक १, काळवाडी क्रमांक २, बेंढारवाडी आणि पसारवाडी या गावांसाठी पुनर्वसनाच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र, आवश्यक निधीचा अभाव आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रत्यक्ष पुनर्वसनाची प्रक्रिया अद्यापही पूर्णत्वास गेलेली नाही. काळवाडी क्रमांक १ मध्ये ग्रामस्थांसाठी गावालगत ३५ भूखंड तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी केवळ ३० घरकुलांना मंजुरी मिळाली असून, मंजूर आर्थिक मदत अपुरी असल्याने अनेक कुटुंबांसमोर घरबांधणीचे आव्हान उभे आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी किंवा सीएसआर निधीतून अतिरिक्त आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. काळवाडी क्रमांक २ येथील ३७ घरांच्या पुनर्वसनासाठी जांभोरीजवळ निंबोणीचीवाडी येथे जागा खरेदी करण्यात आली आहे. मात्र, जागेचे सपाटीकरण, अंतर्गत रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने पुनर्वसनाचा मार्ग अद्याप मोकळा झालेला नाही.

पोखरी गावातील बेंढारवाडीच्या पुनर्वसनासाठी वाडीच्या वरच्या बाजूस सपाट जागा उपलब्ध असूनही स्थानिक अडचणींमुळे भूखंडांचे नियोजन आणि वाटप रखडले आहे. माळीण गावातील पसारवाडीसाठी पुनर्वसनाची जागा खरेदी करून ३२ घरांचे भूखंडही वाटप करण्यात आले आहे. शासनाने लाभार्थ्यांना घरकुल मंजूर केले असले, तरी जागेच्या सपाटीकरणासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे प्रत्यक्ष काम सुरू होऊ शकलेले नाही. फुलवडे गावातील भगतवाडीमध्ये १४ कुटुंबे अतिधोकादायक परिस्थितीत वास्तव्यास आहेत. घरकुल मंजूर असूनही पुनर्वसनासाठी योग्य जागाच निश्चित न झाल्याने ही कुटुंबे आजही दर पावसाळ्यात जीव मुठीत घेऊन दिवस काढत आहेत. दरवर्षी मुसळधार पावसाला सुरुवात झाली की, या सर्व गावांतील नागरिकांच्या मनात भूस्खलनाची भीती पुन्हा डोके वर काढते. माळीणसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये, यासाठी तातडीने पुनर्वसन पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने होत आहे. मात्र, बारा वर्षांनंतरही अनेक कुटुंबांचे सुरक्षित घराचे स्वप्न अपूर्णच असल्याने शासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ग्रामस्थांनी शासनाकडे विशेष निधी उपलब्ध करून पुनर्वसन प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करण्याची मागणी केली असून, यंदाचा पावसाळा तरी अखेरचा भीतीचा ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. माजी सहकार मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे काळवाडी क्रमांक २ गावाच्या पुनर्वसनासाठी खरेदी करण्यात आलेल्या जागेच्या विकासकामांसाठी ७६.३८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे या जागेच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच, माळीण गावातील पसारवाडीच्या पुनर्वसनासाठी जागेच्या सपाटीकरणाच्या कामासाठी १.३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यामुळे या गावाच्या पुनर्वसनाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सारांश वृत्त

### अमेरिका से आया चुपके-चुपके, नाम है अभिजीत दिपके:रामदास आठवलेंची संसदेत फटकेबाजी, लाठीचार्जच्या चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

'नीट' (NEET) पेपरफुटीविरोधात दिल्लीतील जंतरमंतरवर उभारण्यात आलेले यशस्वी आंदोलन आणि 'कॉकरोच जनता पार्टी'चे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके यांची सध्या देशभरात जोरदार चर्चा आहे. या आंदोलनाची दखल आता थेट संसदेतही घेण्यात आली आहे. संसदेच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या खास आणि मिश्किल शैलीत अभिजीत दिपके यांचा उल्लेख करत सभागृहात एकच हशा पिकवला. संसदेत भाषण करताना रामदास आठवले यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आपले बारकाईने लक्ष असल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी आपल्या कवीच्या शैलीत म्हटले की, ''अमेरिका से आया यह चुपके-चुपके, नाम है उसका अभिजीत दिपके.'' आठवलेंच्या या फटकेबाजीवर उपस्थित सर्वच खासदारांना हसू अनावर झाले.

अभिजीत दिपके यांचे कौतुक करताना आठवले पुढे म्हणाले की, ''अभिजीत दिपके हा माझ्याच समाजातील तरुण असून तो एक पक्का आंबेडकरवादी आहे. त्याने ज्या विषयावर हे आंदोलन छेडले, तो खरोखरच अत्यंत महत्त्वाचा विषय होता.'' संसदेवरील मोर्चादरम्यान आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या मुद्द्यावरही आठवलेंनी सरकारची बाजू मांडतानाच पोलिसांच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट केले की, ''सलग २५ दिवस हे आंदोलन अत्यंत शांततेत आणि संयमाने सुरू होते. आंदोलकांना रेल भवनपर्यंत जाण्याची रीतसर परवानगी देण्यात आली होती. तोवर कोणत्याही पोलिसाने बळाचा वापर केला नाही. ''मात्र, जेव्हा जमावाने संसदेकडे जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न केला आणि दगडफेक झाल्याचा प्रकार घडला, तेव्हाच पोलिसांना नाईलाजाने लाठीचार्ज करावा लागला. असे असले तरी, मी या लाठीचार्जचे अजिबात समर्थन करत नाही आणि या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी झालीच पाहिजे,'' अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात मांडली.

# राज्यात सलग आठव्या दिवशी मुसळधार:नाशिक घाटमाथ्याला रेड, संभाजीनगर-जालन्याला यलो अलर्ट; यवतमाळ-हिंगोलीत कार पुरात वाहून गेल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यात सलग आठव्या दिवशीही पावसाचा जोर कायम असून विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मुसळधार सरी कोसळत आहेत. नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गडचिरोलीत पूरस्थिती निर्माण झाली असून जळगाव, विदर्भ आणि नांदेडच्या किनवट तालुक्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जून-जुलै या दोन महिन्यांत राज्यात सरासरीच्या तुलनेत केवळ ९६.४ टक्के, तर मराठवाड्यात ८२.१ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

**महाडच्या शिवथर खोऱ्यात मुसळधार पाऊस, ३ गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील शिवथर खोऱ्यात संततधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. कुंबे शिवथर येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने आंबेनळी, आंबे शिवथर आणि सह्याद्री वाडी या ३ गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे.

**साताऱ्यात दरड कोसळली, रस्ते वाहतुकीसाठी बंद**

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात मुसळधार पावसामुळे दिवशी घाटात दोन ठिकाणी दरड कोसळल्याने ढेबेवाडी–नवरस्ता मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तसेच वाढत्या पाण्यामुळे जुना संगमनगर पूल पाण्याखाली गेला असून परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे.

**पुण्यात अतिवृष्टी, धरणांतून पाण्याचा मोठा विसर्ग: नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे धरणांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे खडकवासला, निरा देवघर, भामा आसखेड आणि पानशेत या चार प्रमुख धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

**चाळीसगावातील १०० वर्षे जुना पालिका भवनाचा भाग कोसळला**

जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चाळीसगाव येथील १०० वर्षांहून अधिक जुन्या नगरपालिकेच्या इमारतीचा काही भाग कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित इमारतीत प्रशासकीय कामकाज होत नसून स्वच्छता व पालिकेचे साहित्य ठेवण्यासाठी तिचा वापर केला जात असल्याने मोठी दुर्घटना टळली.

**खडकवासला धरणातून ४५ हजार क्युसेक विसर्गाची तयारी; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

पुण्यातील खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवून ४५ हजार क्युसेकपर्यंत सोडण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी केले आहे. प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आणि नदीपात्रात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

**यवतमाळमधील अडान नदीच्या पुरात कार वाहून गेली: आईसह २ मुली बेपत्ता**

असताना पुराच्या प्रवाहात इर्टिगा कार वाहून गेल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत एका महिलेसह दोन मुली बेपत्ता झाल्या असून, पतीने झाडाचा आधार घेत थरारक बचाव केला. प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे.

**हिंगोलीत ३० पैकी २७ मंडळात अतिवृष्टी: नदी, नाल्यांना पूर; सेनगावात पुलावरून कार वाहून गेली, चौघे बचावले**

## ग्लासगोमध्ये भारताचा पंचांचा महाप्रहार! सात सुवर्णपदकांसह राष्ट्रकुल स्पर्धेत इतिहास; मुष्टियोद्ध्यांनी जगाला दाखवली ताकद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय मुष्टियोद्ध्यांनी ऐतिहासिक कामगिरी करत एकाच स्पर्धेत तब्बल सात सुवर्ण आणि तीन रौप्यपदके जिंकून भारताच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल अशी कामगिरी केली आहे. भारतीय संघाने एकूण १४ वजनगटांपैकी १० गटांत अंतिम फेरी गाठत वर्चस्व सिद्ध केले.

प्रीती पवार, जैस्मिन, साक्षी, प्रिया, अरुंधती, सचिन आणि अंकुश यांनी अंतिम फेरीत शानदार विजय मिळवत भारताच्या गळ्यात सुवर्णपदकांची माळ घातली. प्रत्येक खेळाडूने आक्रमक खेळ, अचूक पंच आणि दमदार बचावाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना नमवत भारताचा तिरंगा उंचावला. दुसरीकडे जादुमणी, लव्हलिना आणि नरेंद्र यांनी अंतिम फेरीपर्यंत दमदार मजल मारली; मात्र सुवर्णपदकाच्या लढतीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. तरीही त्यांच्या रौप्यपदकांनी भारताच्या एकूण यशात महत्त्वाची भर घातली. विशेष म्हणजे, महिला मुष्टियोद्ध्यांनी या स्पर्धेत विलक्षण सातत्यपूर्ण कामगिरी करत भारतीय मुष्टियुद्धाचा नवा चेहरा जगासमोर आणला. तर पुरुष खेळाडूंनीही निर्णायक क्षणी उत्कृष्ट कामगिरी करून भारताच्या वर्चस्वावर शिक्कामोर्तब केले.

राष्ट्रकुल स्पर्धेच्या इतिहासातील भारतीय मुष्टियुद्धाची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी मानली जात आहे. या यशामुळे आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धा आणि ऑलिम्पिकसाठी भारतीय संघाचा आत्मविश्वास अधिक उंचावला असून, जागतिक मुष्टियुद्धात भारत आता केवळ स्पर्धक नसून बलाढ्य दावेदार असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## एका रात्रीत लाखोंचा पाठिंबा आणि दुसऱ्याच दिवशी यूट्यूबने केले चॅनल बंद! 'मेन इरफान' प्रकरणाने डिजिटल जग हादरले'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दिल्लीतील झोपडपट्टीत राहणाऱ्या मोहम्मद इरफान यांच्या 'मेन इरफान' या यूट्यूब चॅनलने अवघ्या एका रात्रीत प्रचंड लोकप्रियता मिळवली; मात्र त्यानंतर अचानक हे चॅनल बंद करण्यात आल्याने सामाजिक माध्यमांवर संतापाची लाट उसळली आहे. चॅनल उघडण्याचा प्रयत्न केल्यास 'गुगलच्या सेवा नियमांचे उल्लंघन केल्यामुळे हे खाते बंद करण्यात आले आहे' असा संदेश दिसत आहे. मात्र नेमके कोणते नियम मोडले गेले, याबाबत यूट्यूबकडून अद्याप



कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

या कारवाईनंतर हजारो वापरकर्त्यांनी सामाजिक माध्यमांवर मोहिमा सुरू करत 'मेन इरफान चॅनल पुन्हा सुरू करा' अशी मागणी केली आहे. अनेकांच्या मते, झोपडपट्टीत राहणाऱ्या एका सामान्य तरुणाला अचानक मिळालेल्या लोकप्रियतेनंतर त्याचे व्यासपीठच बंद होणे गंभीर आणि संशयास्पद वाटते. तर काहींचे मत असे आहे की, कोणतेही खाते बंद करण्यामागे व्यासपीठाकडे ठोस कारणे असू शकतात आणि अधिकृत माहिती येईपर्यंत अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

या घटनेमुळे मोठ्या डिजिटल व्यासपीठांची पारदर्शकता, सामग्री नियंत्रणाची प्रक्रिया आणि नवोदित निर्मात्यांना नियमभंगाबाबत स्पष्ट माहिती व न्याय्य संधी दिली जाते का, यावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका झोपडपट्टीतील तरुणाचा आवाज अचानक लाखो लोकांपर्यंत पोहोचला आणि त्यानंतर त्याचे डिजिटल अस्तित्वच नाहीसे झाल्याने हे प्रकरण आता केवळ एका चॅनलपुरते मर्यादित न राहता डिजिटल अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या अधिकारांवरील राष्ट्रीय चर्चेचा विषय बनले आहे.

# 'राम मंदिरातील देणगीत घोटाळा तर चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखालीच करा!' काँग्रेसची मागणी; भाजपवर गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराच्या प्रकरणावरून राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, काँग्रेसने या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रमोद तिवारी यांनी भाजपवर गंभीर आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आवश्यक असल्याचे म्हटले.

प्रमोद तिवारी यांनी आरोप केला की, राम मंदिरातील देणगी गैरव्यवहाराची ही पहिली घटना नसून, अनेक वर्षांपासून भाविकांच्या देणगीत अनियमितता होत असल्याचा संशय आहे. उत्तर प्रदेश पोलिसांकडून सध्या सुरू असलेली चौकशी पुरेशी नसल्याचा दावा करत त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली स्वतंत्र तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी केली.

पत्रकार परिषदेत बोलताना तिवारी यांनी भाजपवर निशाणा साधत, प्रत्येक भाजप कार्यकर्ता चोर नाही; पण राम मंदिरातील देणगी चोरणाऱ्यांपैकी प्रत्येक जण भाजपशी संबंधित आहे, असा गंभीर आरोप केला. या विधानामुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

काँग्रेसचे म्हणणे आहे की, देशभरातील लाखो भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीच्या वापराबाबत पूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार, देणगी व्यवस्थापन आणि निधीच्या वापराची सखोल चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, अशी मागणी पक्षाने केली आहे.

दरम्यान, या आरोपांवर भाजपकडून अधिकृत प्रतिक्रिया येणे अद्याप बाकी आहे. तसेच, उत्तर प्रदेश पोलीस कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणाचा तपास करत आहेत. या टप्प्यावर गैरव्यवहाराच्या आरोपांबाबत अंतिम निष्कर्ष किंवा कोणाची दोषी म्हणून न्यायालयीन नोंद झालेली नाही.

राम मंदिरासारख्या अत्यंत संवेदनशील आणि श्रद्धेशी निगडित विषयावर झालेल्या या आरोपांमुळे राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून, आता या प्रकरणाकडे सर्वोच्च न्यायालय, तपास यंत्रणा आणि देशभरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## हरित ऊर्जा प्रकल्प रखडले, आता सरकारचा यू-टर्न? विलंब झालेल्या सौर-पवन प्रकल्पांना पुन्हा दिलासा देण्याचा प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील सौर, पवन आणि संमिश्र (हायब्रिड) हरित ऊर्जा प्रकल्पांना मोठा दिलासा देण्याच्या दिशेने केंद्राने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने (सीईआरसी) प्रसारण वाहिन्यांच्या (ट्रान्समिशन लाईन्स) उपलब्धतेअभावी रखडलेल्या नूतनीकरणक्षम ऊर्जा प्रकल्पांना प्रसारण शुल्कात (ट्रान्समिशन चार्ज) सवलत देण्याचा मसुदा प्रस्ताव जाहीर केला आहे.

देशभरात अनेक सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प तयार असूनही आवश्यक प्रसारण यंत्रणा वेळेत उपलब्ध न झाल्याने ते सुरू होऊ शकले नाहीत. यामुळे हजारो मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प अडकून पडले असून, गुंतवणूकदार आणि वीज उत्पादकांवर आर्थिक ताण वाढला आहे.

विशेष म्हणजे, जुलै २०२५ पासून केंद्र सरकारने नव्या सौर, पवन आणि हायब्रिड प्रकल्पांसाठी आंतरराज्यीय प्रसारण शुल्कावरील सवलती टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता विलंबाला विकासक जबाबदार नसल्याचे लक्षात घेऊन सरकारने धोरणात मवाळ भूमिका घेतल्याचे मानले जात आहे.

मसुदा प्रस्तावानुसार, ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत किमान सात वर्षांचा वीज विक्री करार (पॉवर सेल करार) केलेल्या आणि प्रसारण सुविधेअभावी वेळेत सुरू न झालेल्या प्रकल्पांना ही सवलत लागू होऊ शकते.

याशिवाय, हरित ऊर्जा प्रकल्पांसोबत उभारण्यात येणाऱ्या बॅटरी ऊर्जा साठवण प्रणालींनाही याच सवलतीचा लाभ देण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे बॅटरीमधून पुरवली जाणारी वीजही संबंधित हरित ऊर्जा प्रकल्पाप्रमाणेच प्रसारण शुल्क सवलतीस पात्र ठरेल.

ऊर्जा संक्रमणाचा वेग वाढवणे, स्वच्छ ऊर्जेतील गुंतवणूक टिकवून ठेवणे आणि २०३० पर्यंत नूतनीकरणक्षम ऊर्जेची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे गाठणे या दृष्टीने हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात असून, अंतिम निर्णयानंतर देशातील हरित ऊर्जा क्षेत्राला मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## करार पाळा, नाहीतर पुन्हा युद्ध!' अमेरिकेचा इराणला थेट इशारा; ट्रम्प यांच्या आदेशाची सैन्याला प्रतीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील तणाव पुन्हा वाढण्याची चिन्हे दिसू लागली असून, इराणने शांतता कराराचे पालन केले नाही तर अमेरिका पुन्हा लष्करी कारवाई करेल, असा कठोर इशारा अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, अमेरिकन सैन्य पूर्ण तयारीत असून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाची प्रतीक्षा करत आहे. आदेश मिळताच कोणत्याही क्षणी 'कॉम्बॅट ऑपरेशन' सुरू केले जाऊ शकते.

हेगसेथ यांनी सांगितले की, इराणला अजूनही तडजोडीची संधी आहे. मात्र, ती नाकारल्यास अमेरिका आपली लष्करी रणनीती पुन्हा सक्रिय करेल. तसेच इराणवरील अमेरिकेची नौदल नाकेबंदी सुरूच राहणार असून, धोरणात्मक उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत ती उठवली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अमेरिकन जनरल डॅन केन यांच्या माहितीनुसार, नाकेबंदीमुळे आतापर्यंत १३ जहाजांना माघारी फिरावे लागले आहे. त्यापैकी बहुतेक जहाजे नाकेबंदी क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर परतली, तर एका जहाजाने आधीच आपला मार्ग बदलला. दरम्यान, २१ एप्रिलपर्यंत लागू असलेल्या शस्त्रसंधीपूर्वी अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चेत काही प्रगती झाल्याचे वृत्त आहे. मात्र, काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर अद्यापही दोन्ही देशांमध्ये मतभेद कायम असल्याचे अमेरिकन माध्यमांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर तेहरानमध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर आणि इराणी अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. मुनीर यांनी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली असून, ते अमेरिकेचा संदेश घेऊन आल्याची चर्चा आहे. पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की हे देश या संघर्षात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयालाच कायद्याने उत्तर? 3,000 हून अधिक सीएपीएफ अधिकाऱ्यांचा केंद्राविरोधात सर्वोच्च न्यायालयात एल्गार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशातील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांमध्ये (सीएपीएफ) वरिष्ठ पदांवरील नियुक्त्यांवरून मोठा घटनात्मक आणि प्रशासकीय संघर्ष उभा राहिला आहे. ३,००० हून अधिक गट-अ (ग्रुप 'ए') संवर्गातील कार्यरत सीएपीएफ अधिकाऱ्यांनी केंद्र सरकारने लागू केलेल्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सामान्य प्रशासन) अधिनियम, २०२६ ला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचिकाकर्त्यांमध्ये शौर्यपदक विजेते अधिकारी, महिला अधिकारी तसेच विविध सीएपीएफ दलांतील वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे.

या अधिकाऱ्यांचा आरोप आहे की, संसदेने मंजूर केलेला हा कायदा केवळ प्रशासकीय बदल नसून सर्वोच्च न्यायालयाच्या मे २०२५ मधील ऐतिहासिक निर्णयाचा प्रभाव निष्प्रभ करण्याचा प्रयत्न आहे. न्यायालयाने त्या निर्णयात सीएपीएफमधील वरिष्ठ नेतृत्वाच्या पदांवर प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधिकाऱ्यांचे प्रमाण कमी करून सीएपीएफच्या स्वतःच्या संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीची अधिक संधी द्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले होते.

मात्र, २ एप्रिल २०२६ रोजी संसदेत मंजूर झालेला आणि ९ एप्रिल २०२६ रोजी अधिसूचित करण्यात आलेला नवीन कायदा याच्या नेमक्या उलट परिणाम करणारा असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. या कायद्यामुळे सीएपीएफ संवर्गातील अधिकाऱ्यांना सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिक कठीण होईल, तर



प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या आयपीएस अधिकाऱ्यांसाठी वरिष्ठ पदांचे दरवाजे अधिक खुले राहतील, असा आरोप करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, देशाच्या सीमांचे संरक्षण, दहशतवादविरोधी कारवाया, नक्षलविरोधी मोहिमा, निवडणूक सुरक्षा आणि अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी पार पाडणारे सीएपीएफ अधिकारी अनेक दशकांचा अनुभव मिळवूनही सर्वोच्च नेतृत्वापासून वंचित राहतात. दुसरीकडे, प्रतिनियुक्तीवर आलेले आयपीएस अधिकारी थेट वरिष्ठ पदांवर नियुक्त होत असल्याने कारकीर्दीतील समान संधी आणि सेवाक्षेत्रातील न्याय धोक्यात येत आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयासमोर केवळ पदोन्नतीचा प्रश्न नसून संसदेच्या कायदे करण्याच्या अधिकाराची मर्यादा, न्यायालयाच्या निर्णयांचा प्रभाव, सेवा समानता आणि घटनात्मक तत्त्वे यांचीही कसोटी लागणार आहे. न्यायालयाने केंद्र सरकारकडून भूमिका मागविल्यानंतर या प्रकरणाची सुनावणी होण्याची शक्यता आहे. या याचिकेचा निकाल केवळ ३,००० हून अधिक अधिकाऱ्यांच्या कारकीर्दीवर परिणाम करणार नाही, तर सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, एसएसबी आणि आसाम रायफल्स यांसारख्या केंद्रीय सशस्त्र दलांच्या भविष्यातील नेतृत्व संरचनेवरही दूरगामी परिणाम करू शकतो. त्यामुळे हे प्रकरण देशातील सुरक्षा यंत्रणांच्या प्रशासकीय रचनेशी संबंधित सर्वात महत्त्वाच्या घटनात्मक लढ्यांपैकी एक मानले जात आहे.